खडतर पण संगीतमय जीवनपट

चित्रपट गीते ऐकायला व गुणगुणायला सरळसोपी वाटत असली तरी ती तयार करणे हे तेवढे सोपे नाही. गीतामधील शब्द व भावना समजून घेऊन, गाणाऱ्या गायकाच्या आवाजातील जातकुळी ध्यानात घेऊन आणि चित्रपटातील कथानकात चपखल बसेल अशा प्रकारे गीताची संगीत रचना करणे हे फार कठीण काम आहे. ही सर्व तंत्रे यशस्वीपणे सांभाळणे ज्याला जमते तो सफल संगीतकार ठरतो. अशाच काही यशस्वी संगीतकारांमध्ये सुधीर फडके ऊर्फ बाबूजी यांचे नाव श्रेष्ठ कोटीत घेतले जाते.

सुधीर फडके यांचा जन्म २५ जुलै १९१९ रोजी कोल्हापूर येथे झाला. त्याचे पूर्ण नाव रामचंद्र विनायक फडके. गाण्याच्या एका जाहीर कार्यक्रमाच्या वेळी त्यांच्या एका मित्राने रामचंद्र फडके यांना 'सुधीर फडके' म्हणून श्रोतृवर्गापुढे आणले व त्यापुढील आयुष्याच्या संगीत सफरीत बाबुजी तथा सुधीर फडके म्हणूनच जगविख्यात झाले.

सुधीर फडके यांचे वडील विनायक फडके कोल्हापूरचे नामांकित वकील, देशभक्त व समाजसेवक होते. ते 'कोल्हापूरचे टिळक' म्हणून ओळखले जात. त्यांना संगीतात खूप रस होता व त्या काळीही त्यांनी आपल्या घरी बऱ्याचशा रेकॉर्ड्स व ग्रामोफोन आणून ठेवला होता. आपल्या धाईगर्दीच्या जीवनक्रमातूनही ते रेकॉर्ड्स् ऐकायचे व संगीताचा आस्वाद घ्यायचे. संगीताचे हे अंग वडिलांकडून बाबुजींकडे आले. फरक एवढाच की बालपणीही ते केवळ गाणे ऐकायचे नाहीत तर ऐकलेले गाणे तसेच स्वत: म्हणायचा प्रयत्नही करायचे. बाहेर रस्त्यावरील कोणा भिकारी किंवा बैराग्याचे गाणे कानावर पडले तरी ते त्याची हुबेहुब नक्कल करायचे. छोट्या रामचंद्रामधील गाण्याचा हा गुणी पैलू त्यांच्या वडिलांनी व मामा डॉ. भालचंद्र पटवर्धन यांनी ओळखला. डॉ. पटवर्धन स्वत: एक जाणकार संगीतप्रेमी होते. जमखंडी संस्थानाचे ते मुख्य वैद्यकीय अधिकारी होते व पाध्येबुवा, विनायकबुवा, नारायणराव व्यास, वझेबुवा, बालगंधर्व आणि अब्दुल करीम खान साहेब अशा त्या काळातील मोठ्या शास्त्रीय गायकांशी त्यांची चांगली दोस्ती होती.

त्या काळीत ग्वाल्हेर घराण्याचे थोर गायक पं. वामनराव पाध्ये कोल्हापूर येथे गांधर्व संगीत विद्यालय चालवायचे. वडिलांची परवानगी घेऊन डॉ. भालचंद्र पटवर्धन यांनी आपल्या भाच्याला या पाध्येबुवांकडे संगीत शिक्षणासाठी दाखल केले. शालेय शिक्षणाबरोबरच बाबूजींचे संगीताचे शिक्षणही सुरू झाले. प्रत्येक रागाचा विस्तार, आलाप, मुरके इत्यादी गोष्टी वझेबुवा अत्यंत काटेकोरपणे शिकवायचे त्यामुळे एकेका रागाचे शिक्षण दोन-दोन महिने चालायचे. गांधर्व संगीत विद्यालयात सुधीर फडके यांची संगीताची शास्त्रीय बैठक पक्की झाली. शिवाय ख्याल, तराना, ठुमरी इत्यादी गायन प्रकारही पाध्येबुवा शिकवायचे. पाध्येबुवांनी आपल्या संगीत विद्यालयातर्फे अ.भा. संगीत परिषद आयोजित केली. भारतभरातून अनेक मोठमोठ्या गवय्यांनी हजेरी लावली होती. पाध्येबुवांनी त्या गायकांसमोर या आपल्या छोट्या शिष्यास उभे केले व तुम्ही जो राग सादर कराल तो राग माझा हा शिष्य हुबेहूब त्याच स्वरलिपीत सादर करील, असे जाहीर केले. अनेक गायकांनी आपापल्या विविध शैलीत रागदारी सादर केली व छोट्या रामचंद्रने आपल्या गुरूचा विश्वास सार्थ ठरविला. या घटनेने बाबुजींचा आत्मविश्वास वाढला व आपणही शास्त्रीय संगीत गायक व्हावे, अशी स्वप्ने ते पाहू लागले. पण नियतीला ते मंजूर नसावे.

सन १९२८ मध्ये बाबुजींची आई खूप आजारी झाली व त्यातच तिचा स्वर्गवास झाला. प्रिय पत्नीच्या निधनाने बाबुजींच्या वडिलांच्या मनावर मोठा आघात झाला व सांसारिक गोष्टींमध्ये त्यांचे मन लागेनासे झाले. कित्येक महिने ते वकिली न करता घरी बसून राहिले. हळूहळू अशीले येणे बंद झाले व कोल्हापूरच्या या नामवंत वकिलाची वकिली बंद पडली. घरची आर्थिक परिस्थिती नाजूक झाली व पाच मुलांच्या कुटुंबाचा चरितार्थ चालविणे बाबुजींच्या वडिलांना कठीण झाले. १९२९ च्या दिवाळीत बाबूजी जमखिंडीला आपल्या मामाकडे राहायला गेले. तेथे मुंबईहून आलेल्या डॉ. भाजेकर यांनी डॉ. पटवर्धन यांच्या या छोट्या भाच्याचे गाणे ऐकले. त्यांच्या घरची सर्व परिस्थिती समजावून घेतल्यावर त्यांनी छोट्या रामचंद्रने सर्वांगीण विकासासाठी मुंबईला जावे, असे सूचविले. मुंबईला येऊन त्यांनी शालेय शिक्षणाबरोबरच महाराष्ट्र संगीत विद्यालयात संगीताचे शिक्षण सुरू ठेवले. पं. विष्णू दिगंबर पलुस्कर यांचे भाचे बाबूराव गोखले हे विद्यालय चालवायचे. त्या काळी सरस्वती संगीत विद्यालयातर्फे दरवर्षी शास्त्रीय संगीताची स्पर्धा व्हायची. त्या वर्षी महाराष्ट्र संगीत विद्यालयातर्फे बाबुजींना स्पर्धक म्हणून पाठविले गेले. उस्ताद अब्दुल करीम खाँ साहेब स्पर्धेचे परीक्षक होते. त्यावेळी अवघ्या १२ वर्षांच्या असलेल्या बाबुजींनी मुलतानी रागातील अप्रतिम चीज सादर केली. त्यांच्या गायनाने उस्तान अब्दुल करीम खान एवढे प्रभावित झाले की त्यांनी या स्पर्धकास आणखी एक चीज गाण्यास सांगितले. खाँसाहेबांनी बाबुजींच्या गायनाची मुक्तकंठाने प्रशंसा केली व त्यांना पहिल्या क्रमांकाचा पुरस्कार दिला. गायक होण्याचे स्वप्न पाहणाऱ्या छोट्या रामचंद्राच्या गानप्रवासातील तो सुवर्णक्षण होता. बाबुजी त्यानंतर दोन-तीन वर्षे मुंबईत राहिले व त्यांची कीर्ती सर्वदूर पसरली.

सन १९३३ मध्ये बाबुजींना काही परिस्थितीमुळे मुंबईहून पुन्हा कोल्हापूरला जावे लागले. घरच्या परिस्थितीत काही फारसा फरक पडला नव्हता. त्यांचा मोठा भाऊ आता नोकरीस लागला होता. पण त्याच्या तुटपुंज्या पगारात घर चालविणे मुश्कील होते. १९३५ च्या सुमारास बाबुजींनी एका मराठी शाळेत संगीत शिक्षकाची नोकरी धरली. त्याच बरोबर त्यांनी शास्त्रीय संगीताच्या जोडीला सुगम संगीत गाण्याचाही अभ्यास सुरू केला. हिराबाई बडोदेकर, बालगंधर्व यांच्या गायकीचा त्यांनी बारकाईने अभ्यास केला व त्यांतून बरेच काही शिकण्याचाही प्रयत्न केला. सन १९३६ मध्ये बाबुजींच्या वडिलांचे निधन झाले व त्याने त्यांच्यावर मोठा आघात झाला. त्याच काळात त्यांच्या एका मित्राने बाबुजींना राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे कार्य व तत्त्वप्रणालीशी ओळख करून दिली. सभोवतालच्या राजकीय व सामाजिक परिस्थितीविषयी बाबुजी नेहमीच जागरूक असायचे. संघाच्या तत्त्वज्ञानाने ते प्रभावित झाले. डॉ. हेडगेवार यांच्या विचारांचा त्यांच्यावर पगडा बसला व ते संघ स्वयंसेवक झाले. एका मित्राच्या सांगण्यावरून बाबुजींनी याच काळात पुण्यात नव्याने सुरू झालेल्या संगीत विद्यालयात शिक्षकाची नोकरी धरली. परंतु पुण्यात त्यांचे जमले नाही व ते मुंबईला परत आले. मुंबईत ते संघाच्या कार्यालयातच राहायचे. मुंबईत बाबुजी जे काही कमवायचे ते संघाच्या कामात खर्च

पान ४ पाहा ➤

खडतर पण संगीतमय जीवनपट

पान १ वरून ➤ व्हायचे. त्यामुळे पैशाची नेहमीच चणचण असायची.

अशा प्रकारे सुमारे तीन महिने अत्यंत हालाखीत दिवस काढल्यावर बाबुजींचे एक मित्र वैद्यकुमार रायकर यांनी त्यांना आपल्या घरात आश्रय दिला. स्वत: रायकर यांचीही सांपत्तिक स्थिती फारशी चांगली नव्हती. पण त्यांच्या मनाची श्रीमंती मोठी होती. त्या काळात रायकर यांच्या घरातच बाबुजींनी गाण्याचा क्लास सुरू केला. पण तो फार दिवस चालला नाही. चहा व भाजी विकण्याचा धंदाही त्यांनी करून पाहिला. पण पैसा खूप कमी व ढोरमेहनत जास्त अशी त्या धंद्यांची स्थिती होती. त्या काबाडकष्टांचा बाबुजींच्या प्रकृतीवर वाईट परिणाम झाला. तब्येत वारंवार बिघडू लागली तेव्हा रायकर यांनी बाबुजींना मुंबई सोडण्याचा सल्ला दिला. त्यानुसार १ सप्टेंबर १९३९ रोजी ते मुंबई सोडून नाशिकला रवाना झाले.

बाबुजींचा स्वभाव भिडस्त पण स्वाभिमानी होता. त्यांना आपल्या आवाजाच्या ताकदीची कल्पना होती. कोणाही मित्र किंवा नातेवाईकावर विसंबून न राहता गावोगाव गाण्याचे कार्यक्रम करण्याचे त्यांनी ठरविले. नाशिकहून मालेगाव, अंमळनेर, धुळे, एरंडोल अशी त्यांची गावोगाव भटकंती सुरू झाली. बाबुजींनी मुंबईचे संघ कार्यालय सोडले होते पण संघ सोडला नव्हता. त्यामुळे ज्या गावात जात तेथे त्यांना संघ कार्यकर्त्यांची मदत व्हायची. गाण्याच्या कार्यक्रमांतून कधी चांगले पैसे मिळायचे, तर कधी कमी. एकंदरीत दिवस चांगले चालले होते. रामगडच्या संस्थानिकाने अशाच एका कार्यक्रमावर खूष होऊन त्या काळात बाबुजींना १०० रुपये बिदागी दिली होती. असे कार्यक्रम करीत ते भारतभर फिरले. त्यावेळेस मुंबईतील एच. एम. व्ही. कंपनी कोल्हापूरात रेकॉर्डिंगसाठी आली होती. कोल्हापूरमधील नवोदित कवी, गायक, संगीतकारांना आपली कला पेश करण्यासाठी हा एक दुर्मिळ योगच होता. बाबुजींचे एक मित्र माधव पातकर हे गायक होते. त्यांनी बाबुजींना एक गाणे देऊन त्याला संगीत देण्याविषयी विनंती केली. बाबुजींनी गीताची जातकुळी समजून उमजून जे संगीत दिले, ते पातकर यांना खुप भावले. त्यांनी बाबुजींची एच.एम. व्ही. कंपनीच्या वसंत कामेरकरांशी भेट घडवून आणली, त्यावेळी बाबुजींनी ते गीत गाऊन दाखविले ते सर्वांनाच आवडले. कामेरकरांना त्या गाण्याच्या चालीबरोबर बाबुजींचा आवजाही आवडला. त्यांनी बाबुजींना ते गाणं स्वत: गाऊन रेकॉर्ड करण्याचा आग्रह केला. त्या गाण्याचे बोल होते..: दर्यावरी नाच करी होडी चाले भिरीभिरी. त्या गाण्याचे गीतकार होते ग. दि. माडगुळकर. या गाण्याच्या रेकॉर्डिंगच्यावेळी बाबुजींची ओळख माडगुळकरांशी झाली आणि थोड्याच दिवसांत ओळखीचे रुपांतर घट्ट मैत्रीत झाले. त्यानंतर अनेक वर्षे दोघांनी एकत्र मिळून काम केले आणि मराठी चित्रपटसंगीताला एकाहून एक सरस गाणी बहाल केली.

त्यानंतर बाबुजींनी काही दिवस एच.एम. व्ही. कंपनीत नोकरी केली. तेथे त्यांना विविध भाषांची आणि विविध शैलीतील गीते शिकण्याचा / ऐकण्याचा अनुभव मिळाला. १९४५मध्ये त्यांनी ही नोकरी सोडली आणि संगीतकार म्हणून स्वतंत्रपणे काम सुरू केले. त्यांनी स्वतंत्रपणे संगीतदिग्दर्शन केलेला पहिला चित्रपट म्हणजे 'रुक्मिणी स्वयंवर'. हा चित्रपट हिंदी व मराठी या दोन्ही भाषांमध्ये होता. यानंतर 'जीवाचा सखा' (१९४८), 'सीता स्वयंवर' (१९४८), 'वंदे मातरम्' (१९४९), 'वंशाचा दिवा' (१९५०) आणि 'पुढचं पाऊल' (१९५०) आदी चित्रपटांना संगीत दिले.

'पुढचं पाऊल'च्या निमित्ताने सुधीर फडके, ग. दि. माडगुळकर आणि राजा परांजपे हे तिघे एकत्र आले आणि त्यांनी पुढील सुमारे वीस वर्षे 'लाखाची गोष्ट', 'ऊन-पाऊस', 'गंगेत घोडं न्हालं', 'आंधळा मागतो एक डोळा', 'देवघर', 'जगाच्या पाठीवर', 'सुवासिनी', 'हा माझा मार्ग एकला' इत्यादी एकाहून एक सरस चित्रपट मराठी रसिकांना दिले.

जवळपास एकशे दहा चित्रपटांशी बाबुजींचा संबंध आला. 'तोच चंद्रमा नभात', 'तिन्ही लोक आनंदाने', 'कधी बहर, कधी शिशिर', 'सखी, मंद झाल्या तारका', 'स्वर आले दुरूनी', 'समाधी साधन, संजीवन नाम' वगैरे अलोट लोकप्रियता लाभलेली गीतं ते गायले आणि 'गीतरामायण' नावाचा इतिहासच त्यांनी १९५६ साली घडवला. त्यातली श्रीरामांची सर्व गाणी त्यांनी स्वत: गायिली आहेत. 'गीतरामायण'चे गायन हा सुगम संगीताच्या सृष्टीतला एक चमत्कारच ठरला. बाबुजींचं नाव त्यामुळे घराघरात गेलं.

मानसन्मान : 'सूर सिंगार संसद' या 'स्वामी हरिदास पुरस्कार' दोनदा मिळाला. त्यांनी निर्माण केलेल्या 'हा माझा मार्ग एकला' या चित्रपटाला १९६३ साली राष्ट्रपतींचे सुवर्ण पदक मिळाले. महाराष्ट्र सरकारचे उत्कृष्ट संगीत दिग्दर्शक आणि गायक म्हणून अनेक पुरस्कार मिळाले. 'संगीत नाटक अकादमी'चा अभिजात संगीताचा पुरस्कार १९९१ साली मिळाला. महाराष्ट्र सरकारचा 'व्ही. शांताराम पुरस्कार' १९९५ साली मिळाला. 'उष:प्रभा अधिष्ठान'चा 'चित्रपती पुरस्कार' १९९६ साली मिळाला. 'कुसुमाग्रज प्रतिष्ठान'चा 'गोदावरी पुरस्कार' १९९६ साली मिळाला. जेरूसलेम येथे संपन्न झालेल्या चौथ्या जागतिक मराठी परिषदेत भव्य सत्कार झाला. चित्रपट महामंडळाचे ते अध्यक्ष होते. ते अध्यक्ष असताना १९८२ साली त्यांनी मराठी चित्रपटांचा अमेरिका आणि कॅनडात महोत्सव साजरा केला. याव्यतिरिक्त कितीतरी लहानमोठ्या पुरस्कारांनी बाबुजींना सन्मानित केले आहे. त्यांची मोजदाद करणं कठीण...

गोवा मुक्ती आंदोलनात सक्रिय भाग आणि गोवा स्वतंत्र झाल्यावर स्वातंत्र्यवीर मोहन रानडे आणि मस्कारंन्हीस यांची लिस्बनच्या तुरुंगातून सुटका व्हावी म्हणून विलक्षण कष्ट घेतले आणि त्या दोघांची पोर्तुगीज तुरुंगातून सुटका केली. स्वातंत्र्यवीर सावरकर यांच्या भव्य आणि उदात्त जीवनावर स्वत: चित्रपट निर्माण केला. या चित्रपटासाठी निधी गोळा करण्यासाठी देशभर आणि जगभर गाण्याचे कार्यक्रम केले. २५ जुलै १९९३ रोजी मुंबईत त्यांचा अमृतमहोत्सव फार भव्य प्रमाणात साजरा झाला. 'स्वरतीर्थ' नावाचा बाबुजींच्या एकूणच जीवनाचा विविधांगी वेध घेणारा संपादित ग्रंथ वर्षा- दीड वर्षांपूर्वी प्रकाशित झाला. ■